# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

**दुरध्वनी क्र.** 0712-6465145/46

**E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in**

**फॅक्स क्र.** 0712-2561663

**Website: rdtenagpur.org.in**


क्र.तशिस/प्राकाना/शैवि/NSP Portal/2020/ 531

दिनांक:- 7 FEB 2020

प्रति,

संचालक/प्राचार्य,
सर्व पदवी/पदव्युत्तर पदवी तसेच पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय :- **तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयामार्फत महा-डीबीटी पोर्टलवरील राबविण्यात येत असलेल्या योजनांकरीता पात्र विद्यार्थ्यांचे संस्थास्तरावर प्रलंबीत अर्ज त्वरीत मान्यतेकरीता सादर करण्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, सन 2019-20 साठी **MAHADBT Portal** वरील समावेशीत विविध शिष्यवृत्ती योजनांपैकी 1) **राजश्री छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना** 2) **डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना** 3) **उच्च व्यावसायिक व इयत्ता 12 वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना (भाग-1 वैद्यकीय अभ्यासक्रम वगळुन)** या योजनांकरीता अर्ज केलेल्या व अशा विद्यार्थ्यांचे संस्थास्तरावर प्रलंबीत असलेले अर्ज आपल्या संस्था Login मध्ये पडताळणी करुन त्वरीत या कार्यालयाकडे मान्यतेकरीता पाठविण्यात यावे जेणेकरुन सदर विद्यार्थी हे योजनेपासुन वंचित राहणार नाहीत.

या कार्यालयामार्फत पडताळणी केली असता असे निदर्शनास आले की अद्यापही सर्व संस्थांकडे मिळुन एकुण 215 अर्ज प्रलंबित आहेत तरी हे सर्व अर्ज तात्काळ आणि विहित मुदतीत निकाली काढण्याकरीता सर्व संस्थांनी त्यांच्या Login मध्ये प्रलंबित असलेले अर्ज पडताळणी करुन या कार्यालयाकडे त्वरीत पाठवावे तसेच जे अर्ज या कार्यालयाकडुन संस्थेकडे Sent back to applicant केलेले आहेत हे अर्ज त्वरीत विद्यार्थ्यांना Revert करुन त्यांचेकडून त्रुटीची पुर्तता करुन परत या कार्यालयाकडे मान्यतेस पाठवावे व जे विद्यार्थी त्रुटींची पुर्तता करु शकत नसतील अशा विद्यार्थ्यांचे अर्ज त्वरीत reject करावे जेणेकरुन प्रलंबित अर्जाची संख्या वाढणार नाही.

तरी सर्व संस्थांनी प्रलंबित अर्जांच्या पडताळणीची प्रक्रीया विहित मुदतीत पुर्ण करण्यात यावी जेणेकरुन एकही प्रलंबित विद्यार्थी या योजनेपासुन वंचित राहणार नाही जर विद्यार्थी संस्थेच्या चुकीमुळे या लाभापासुन वंचित राहील्यास याची सर्वस्वी जबाबदारी ही संस्थेची राहील याची नोंद घ्यावी.

(डॉ. राम निबुदे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण वि.का., नागपूर

F:\data bac\my General Letter ISM 06 for deo1.docx